महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 22 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 238 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# माझ्या मराठीची बोलू कौतुके

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन दिल्लीमध्ये पार पडले. यावेळी देशाच्या आर्थिक राजधानीच्या राज्यातून देशाच्या राजधानीत आलेल्या सर्व मराठी सारस्वातांना माझा नमस्कार,असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीत भाषणाला सुरूवात केली. दिल्लीमध्ये या साहित्य संमेलनाचं आयोजन होतंय. एक भाषा किंवा एका राज्यापुरतं हे आयोजन नाहीये. मराठी साहित्य संमेलनात आझादीच्या लढाईची महक, सांस्कृतीची विरासत आहे. ज्ञानबा-तुकारामांच्या मराठीला आज राजधानी दिल्लीतून अतिशय मनापासून अभिवादन करते, असं मोदी म्हणालेत. अठराशे अठ्ठ्याहत्तरमध्ये पहिल्या आयोजनापासून आतापर्यंत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन प्रवासाचे साक्षीदार आहेत. आज जागतिक मातृभाषा दिवस आहे. यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी दिवस अतिशय चांगला निवडला असं मोदी (PM Modi News) म्हणालेत. यावेळी मोदी म्हणाले की, माझ्या मराठीचे बोलु कौतुके...मराठी भाषा अमृताहून जास्त गोड आहे. त्यामुळे मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीप्रती असणारं माझं प्रेम तुम्हाला चांगलं माहितंय. मराठी बोलण्याचा प्रयत्न, मराठीचे नवीन शब्द शिकण्याचा प्रयत्न मी नेहमीच केलाय, असं देखील ते म्हणालेत. महाराष्ट्राच्या धर्तीवर मराठीभाषा एका महापुरूषाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचं बीज रोवलं होतं. ते आता मोठं वटवृक्ष झालंय. माझं सौभाग्य आहे की, माझ्यासारख्या लाखो लोकांना आरएसएसने देशासाठी जगण्याची प्रेरणा दिलीय. संघामुळेच मला मराठी भाषा आणि मराठी परंपरेसोबत जोडण्याची संधी मिळाली. याच कालखंडात काही महिन्यांपूर्वी अभिजात भाषेचा दर्जा मिळालाय. हे काम पूर्ण करण्याची संधी मला मिळाली. देशात आणि जगात बारा करोडपेक्षा जास्त लोक आहेत. भाषा केवळ संवादाचं माध्यम नाही. तर संस्कृतीची संवाहक आहे. भाषा समाजात जन्म घेतात, परंतु समाज निर्माणात तितकीच महत्वाची भूमिका बजावते. समर्थ रामदासांच्या पंक्तींचे यावेळी त्यांनी उदाहरण दिले. मराठीमध्ये शुरता आणि विरता आहे. सौंदर्य अन् संवेदना आहे. समानता आणि समरसता देखील आहे. आधुनिकता पण भक्ती, शक्ती आणि युक्ती मराठीत असल्याचं त्यांनी म्हटलंय.




## येवई येथील गोदामांची आग अजूनही धुमसते !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामिण प्रतिनिधी

भिवंडी तालुक्यातील येवई येथील गोदामांना लागलेली आग अजूनही धुमसत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. 19 फेब्रुवारी रोजी पहाटे 5 च्या सुमारास लागलेल्या या आगीमध्ये जिवितहानी झाली नसून मात्र या वेअरहाऊस मधील साहित्य जळून नुकसान झाले आहे. येवई येथील आर.के. लॉजीस्टिक येथे गोदामवाले ट्रेडिंग अँड लॉजीस्टिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे तसेच ईमामी अॅग्रोटेक लि., मॅट्रिक्स ऑरकिटेचरल सोल्युशन, जे.डी. होलसेल, मॅट्रिक्स वर्क स्पेश सोल्युशन, स्पोक टेक सोल्युशन, रिन्युवअर्स रॉबिनन्स ग्लोबल लॉजीस्टिक, इंडिस्प्रिशन फूड्स, निलम अॅप्लायन्सेस लि. आणि मस्कचे साहित्य असे एकत्र असलेले वेअरहाऊस मध्ये आग लागून नुकसान झाले आहे. दरम्यान, या गोदामांना लागलेली आग अजूनही धुमसत असून आगीचे कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही तर या घडलेल्या घटनेत कुठलीही जिवितहानी झाली नसून याबाबत भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे तर पुढील तपास पोलीस अधिकारी करीत आहेत.

## ‘डिस्नेलँड’च्या धर्तीवर नवी मुंबईत थीम पार्क

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मिकी माऊस, मिनी माऊस, डोनाल्ड डक, गुफी अशा कार्टूनमधील आपल्या आवडत्या पात्रांना भेटण्याची आणि विविध थरारक राईड्सचा अनुभव घेण्याची संधी लवकरच मुंबई, नवी मुंबईतील लहानग्यांना उपलब्ध होणार आहे. कारण नवी मुंबईत २०० हेक्टर जागेवर ‘डिस्नेलँड’च्या धर्तीवर ‘थीम पार्क’ साकारण्यात येणार आहे. ‘मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) ग्रोथ हब’च्या अंतिम आराखड्यात हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

# कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा!

## दहावीचा पहिलाच पेपर फुटला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जालना : महाराष्ट्रात इयत्ता बारावी बोर्डाची परीक्षा सुरू असतानाच 21 फेब्रुवारीपासून दहावी बोर्डाची परीक्षाही सुरू झाली. राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या लेखी परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. संतापजनक म्हणजे सकाळी 11 वाजता मराठीचा पेपर सुरू झाल्यानंतर काहीच वेळात उत्तर पत्रिकेची झेरॉक्स मिळू लागली. जालना जिल्ह्यातील बदनापूर इथं मराठीचा पेपर फुटला.

पेपर सुरू झाल्यानंतर अवघ्या 15 मिनिटांतच प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राच्या बाहेर आल्यानं शहरातील झेरॉक्स सेंटरमधून थेट उत्तरपत्रिकांच्या प्रिंट काढून सर्रास विद्यार्थ्यांना पुरवल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार बदनापूरमधून समोर आला. दहावी हा करियरचा अतिशय महत्त्वाचा आणि पहिला टप्पा असतो. अशात हा कॉपीचा गैरप्रकार समोर येणं संतापजनक आहे. शिवाय यामुळे शासनाकडून कॉपीमुक्त परीक्षेसाठी करण्यात आलेल्या तयारीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. जालना जिल्ह्यात जवळपास 102 परीक्षा केंद्रांवर साधारण 32 हजार विद्यार्थी दहावीची परीक्षा देत आहेत. धक्कादायक म्हणजे जालन्यात परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचं पाहायला मिळालं. मंठा तालुक्यातील तळणी येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये हा प्रकार घडला. ही गर्दी पाहून पोलीसही हादरले. शासनानं कॉपीमुक्त परीक्षेसाठी जय्यत तयारी केली होती, परंतु पहिल्याच दिवशी या कॉपीमुक्त परीक्षा अभियानाचा फज्जा उडाला. दुसरीकडे जळगावमध्येही दहावी बोर्ड परीक्षेच्या पहिल्याच दिवशी कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडाल्याचं पाहायला मिळालं. शहरातील अनेक परीक्षा केंद्रांवर सर्रास कॉपी पुरवल्या जात होत्या. कॉपीमुक्त अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासन सतर्क असल्याचा दावा केला जात होता, त्यानुसार परीक्षा केंद्रांवर मोठा बंदोबस्त असतानाही पहिल्याच दिवशी हा गैरप्रकार समोर आला.

## सफाई कामगारांच्या संपामुळे अंबरनाथ शहरात कचऱ्याचे ढीग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथ शहरात शुक्रवारी सकाळपासून कचऱ्याचे ढीग दिसू लागले असून कचरा उचचला जात नसल्याची बाब समोर आली आहे. शहरात कचरा उचलणाऱ्या कंत्राटदाराला पालिकेने तब्बल ७ महिने बिलाचे पैसे अदा केले नाही. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांचे पगारही रखडले असून संतप्त कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी कामबंद आंदोलन पुकारले. त्यामुळे शहरात दुर्गंधी पसण्याची शक्यता आहे. अंबरनाथ नगरपालिकेने ऑगस्ट महिन्यात शहरातील कचरा उचलण्यासाठी एका कंपनीची नेमणूक केली होती. मात्र ऑगस्ट महिन्यापासून ते आजतागायत या कंपनीला पालिकेने बिलाचे पैसे दिलेले नाही. त्यामुळे ठेकेदाराचे आर्थिक गणितही कोलमडल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधिक कंत्राटदाराकडून सफाई कर्मचाऱ्यांनी वेतन दिले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संतापलेल्या घंटागाडी कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी घंटागाडी न चालवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अंबरनाथ शहरातील कचरा उचलला गेला नाही. याबाबत नागरिकांनी पालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्यानंतर पालिका कर्मचाऱ्यांची धावाधाव सुरू झाली. कचऱ्याचा प्रश्न निकाली न निघाल्यास शहरात दुर्गंधी पसरून आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होते आहे.




# चाळ माफियांचा हॉट स्पॉट?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील ६५ बेकायदा बांधकामांचा प्रश्न चर्चेत असताना खडवली परिसरात बेकायदा चाळी उभारल्या जात आहे. त्याकडे पोलिस, वनखाते आणि पंचायत समितीचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. खडवली हा बेकायदा बांधकामांचा हॉट स्पॉट होत असल्याचे बोलले जात आहे. खडवली हा परिसर महापालिका हद्दीत येत नाही.खडवली येथील बेकायदा बांधकाम प्रकरणी एक याचिका दाखल होती. उच्च न्यायालयाने अशी अनधिकृत बांधकामे झाल्यास महसूल, वन विभाग, पोलिस आणि पंचायत समितीला बाबदार धरले जाईल असे सूचित केले होते. मात्र खाजगी जागेवर तर अनधिकृत बांधकामे करुन चाळी उभारल्या जात आहेत. याच चाळीतील बेकायदा घरे सामान्य नागरीकांना स्वस्तात विकून त्यांची आर्थिक फसवणूक केली जात आहे. ही फसवणूक रोखण्यासाठी या बेकायदा बांधकामावर कारवाई केली गेली पाहिजे अशी मागणी या भागातील नागरीकांकडून केली जात आहे.

# अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरण १४७ पानांचे दोषारोपपत्र दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-अल्पवयीन मुलीवर लैगिंक अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपी विशाल गवळी आणि त्याची पत्नी साक्षी गवळी या दोघांच्या विरोधात कल्याणच्या कोळसेवाडी पोलिसांनी दोषारोप पत्र कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात आज शुक्रवारीदाखल केले आहे. एक हजार सहा पानांचे हे दोषारोप पत्र आहे. जलद गती न्यायालयात हा खटला चालविला जाणार आहे. सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम हे काम पाहणार आहेत.कल्याण पूर्वेत एका अल्पवयीन मुलीवर लैगिंक अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. आरोपी विशाल गवळी याने अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या केली. या कामात आरोपी विशाल याची पत्नी पत्नी साक्षी गवळी हिने त्याला साथ दिली होती. विशाल गवळी याने २३ डिसेंबर २०२४ रोजी ही घटना घडली. या प्रकरणात कोळसेवाडी पोलिसांनी आधी विशाल गवळी याची पत्नी साक्षी गवळीला अटक केली. तिच्या खुलाश्यानंतर बुलढाणा येथील शेगावमधून एका सलूनच्या दुकानातून आरोपी विशाल गवळीला अटक केली. मुलीच्या मृत्यूनंतर विशाल आणि साक्षी या दोघांनी मुलीचा मृतदेह बापगाव परिसरात फेकून दिला होता. या प्रकरणात तांत्रिक दृष्ट्या सर्व पुरावे जमा केले आहेत. मुलीचे अपहरण करुन तिचा मृतदेह फेकून देण्याच्या घटनेतील काही सीसीटीव्ही फुटेज पोलिसांकडे आहेत. कल्याणचे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे, कल्याणचे सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्यासह तपास अधिकारी गणेश न्यायदे यांनी दोषारोप पत्र दाखल करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. कुठली त्रूटी राहू नये याची काळजी पोलिसंनी घेतली आहे. कल्याण जलदगती न्यायालयात हा खटला चालवून आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी सर्व स्थरातून करण्यात आलेली आहे. त्यामुळे या खटल्याची सुनावणी आत्ता लवकरच सुरु होईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## ठाणे जिल्हापरिषद शिक्षक पदोन्नतीमध्ये दिव्यांगांवर अन्याय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर (वार्ताहर) : दिव्यांग शिक्षकांना डावलून इतर शिक्षकांची पदोन्नती करण्याचा धक्कादायक प्रकार ठाणे जिल्हापरिषदेत झाल्याचे समोर आले आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्रथम पदोन्नती देण्याबाबत उच्च न्यायालयाचे तसेच शासनाचे आदेश असताना ठाणे जिल्हा परिषदेने धिसाढघाई करीत इतर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देऊन दिव्यांगांना डावलल्याने त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. दिव्यांगांना डावलून इतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती करण्यात आल्याने यामागे नेमके काय गौडबंगाल आहे या चर्चेला उधाण आले असून जिल्हापरिषदेच्या या पदोन्नती प्रक्रियेने संतप्त झालेले दिव्यांग कर्मचारी न्यायालयात धाव घेऊन दाद मागणार आहेत. ठाणे जिल्हा परिषदेतील पदोन्नती करताना प्रथम दिव्यांग कर्मचाऱ्यांची पदोन्नती करावी व नंतर इतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती करावी असे उच्च न्यायालय व शासनाचे आदेश आहेत. असे असताना दिव्यांग पदे राखीव ठेवून इतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती करण्यात आली असल्याचा थेट आरोप महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने केला आहे. पदोन्नती बाबत दिव्यांग संघटनेने ३१ डिसेंबर २०२४ ला लक्ष वेधल्यानंतर ठाणे जिल्हापरिषदेने दिव्यांगांसाठी आरक्षित पदांवर सेवाजेष्ठतेनुसार पात्र दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी दिव्यांग पदांची सुनिश्चिती होण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे विनंती केली होती. मात्र याबाबत प्रधान सचिवांच्या उत्तराची वाट न पाहता जिल्हापरिषदेने दिव्यांगांना डावलून ५२ शिक्षकांना पदोन्नती देण्यात आल्याने दिव्यांगांवर अन्याय झाला असून तीव्र असंतोष पसरला आहे.

## गीतासार



यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः । तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर ॥ ३-९ ॥

यज्ञानिमित्त केल्या जाणाऱ्या कर्मांशिवाय दुसऱ्या कर्मात गुंतलेला हा मनुष्यसमुदाय कर्मांनी बांधला जातो. म्हणून हे कुंतीपुत्र अर्जुना, तू आसक्ती सोडून यज्ञासाठी उत्तम प्रकारे कर्तव्यकर्म कर. ॥ ३-९ ॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ ३-१० ॥

प्रजापती ब्रह्मदेवाने कल्पारंभी यज्ञासह प्रजा उत्पन्न करून त्यांना सांगितले की, तुम्ही या यज्ञाच्या द्वारे उत्कर्ष प्राप्त करून घ्या आणि हा यज्ञ तुमचे इच्छित मनोरथ पूर्ण करणारा होवो. ॥ ३-१० ॥

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः । परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ३-११ ॥

तुम्ही या यज्ञाने देवतांची पुष्टी करा आणि त्या देवतांनी तुम्हाला पुष्ट करावे. अशा प्रकारे निःस्वार्थीपणाने एकमेकांची उन्नती करीत तुम्ही परम कल्याणाला प्राप्त व्हाल. ॥ ३-११ ॥

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः । तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ ३-१२ ॥

यज्ञाने पुष्ट झालेल्या देवता तुम्हाला न मागताही इच्छित भोग खात्रीने देत राहातील. अशा रीतीने त्या देवतांनी दिलेले भोग त्यांना अर्पण न करता जो स्वतःच उपभोगतो, तो चोरच आहे. ॥ ३-१२ ॥

## आरोग्य

## झिंकची कमतरता



१. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होणे: रोगप्रतिकारक पेशींच्या निर्मिती आणि कार्यात झिंक महत्त्वाची भूमिका बजावते. त्याच्या कमतरतेमुळे शरीर संसर्गास अधिक संवेदनशील बनते. तुम्हाला वारंवार सर्दी, फ्लू, त्वचेचे संसर्ग आणि इतर आजार होऊ शकतात.

२. जखमा हळूहळू बऱ्या होणे: जखमा बऱ्या करण्यात झिंक महत्त्वाची भूमिका बजावते. त्याच्या कमतरतेमुळे, जखमा बऱ्या होण्यास जास्त वेळ लागू शकतो आणि त्यांना संसर्ग देखील होऊ शकतो.

३. चव आणि वासाची भावना कमी होणे: चव आणि वासाची भावना राखण्यात झिंक महत्त्वाची भूमिका बजावते. त्याच्या कमतरतेमुळे या इंद्रियांमध्ये घट होऊ शकते.

४. केस गळणे आणि नखे कमकुवत होणे: केस आणि नखांच्या आरोग्यासाठी झिंक आवश्यक आहे. त्याच्या कमतरतेमुळे केस गळणे, कमकुवत होणे आणि नखे ठिसूळ होणे होऊ शकते.

५. थकवा आणि अशक्तपणा: ऊर्जा निर्मितीमध्ये झिंक महत्त्वाची भूमिका बजावते. त्याच्या कमतरतेमुळे थकवा, अशक्तपणा आणि आळस जाणवू शकतो.

६. त्वचेच्या समस्या: त्वचेच्या आरोग्यासाठी झिंक देखील महत्त्वाचे आहे. त्याच्या कमतरतेमुळे त्वचेचा कोरडेपणा, खाज सुटणे, लालसरपणा आणि मुरुम यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

७. लक्ष केंद्रित करण्यात अडचण: मेंदूच्या कार्यासाठी झिंक देखील महत्त्वाचे आहे. त्याच्या कमतरतेमुळे लक्ष केंद्रित करण्यात अडचण, स्मरणशक्ती कमी होणे आणि चिडचिड होऊ शकते.

# कस्तुरबा मोहनदास गांधी

कस्तुरबा मोहनदास गांधी यांच्या जन्म 11 एप्रिल 1869 मध्ये पोरबंदरच्या काठियावाड येथे एक श्रीमंत व्यापारी गोकुळदास कपाडिया यांच्या घरी झाला. कस्तुरबा गांधी या महात्मा गांधींच्या धर्मपत्नी होत्या. लग्नाच्या वेळी दोघांचेही अवघे वय 13 वर्षे होते. कस्तुरबा गांधी या लग्नाच्या वेळी निरक्षर होत्या. कस्तुरबा गांधींचे टोपण नाव 'बा' हे होते. त्या निरक्षर असल्यामुळे महात्मा गांधींनी त्यांना लिहायला वाचायला शिकवले. त्या नंतर मात्र गांधीजी हे विद्याभ्यासासाठी लंडनला गेले. तेव्हा कस्तुरबा या भारतातच राहिल्या. त्यांना हरिलाल, मणिलाल, रामदास, देवदास अशी मुले होती. 1906 मध्ये ब्रम्हचर्य पालनाचा निर्णय महात्मा गांधींनी घेतला. तसेच कस्तुरबांनी या निर्णयास खंबीर साथ दिली. तसे पहायला गेले तर गांधीजींचे अनेक निर्णय त्यांना पटत नसत. तरी पण त्या प्रत्येक निर्णयात



महात्मा गांधीजीं सोबत राहिल्या, कस्तुरबा या खूप गोड बोलायच्या. तसेच त्या धार्मिक देखील होत्या व आपल्या पतीप्रमाणे त्यांनी जातिभेदाचा त्याग केला व सर्व जातीधर्मांच्या लोकांबरोबर आश्रमात राहिल्या.

पतीच्या राजकीय कार्यात कस्तुरबा गांधींनी सक्रिय सहभाग घेतला होता. 1897 साली त्या महात्माजींबरोबर राहण्यासाठी दक्षिण आफ्रिकेस गेल्या. तसेच तिथे कस्तुरबा गांधींनी गांधीजींसोबत जवळून काम केले. त्यावेळेस महात्मा गांधी हे वर्णद्वेषाच्या विरोधात लढत होते, तेव्हा कस्तुरबा या गांधीजींच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या. तसेच कस्तुरबा गांधींना तीन महिने आफ्रिकेत तुरुंगात राहावे लागले त्यावेळी त्यांनी अन्न सेवन न करता फक्त फळे सेवन केली. कस्तुरबा गांधींचे स्वातंत्र्यातील योगदान खूप मोठे आहे. महात्मा गांधींनी त्यांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत केली. म्हणूनच त्या निष्ठावंत होत्या. त्यांनी गांधीजींना खूप साथ दिली. गांधीजी आणि कस्तुरबा भारतात परतले तेव्हा कस्तूरबांनी अत्यंत साधे जीवन स्वीकारले. तसेच त्या आंदोलने आणि सत्याग्रहांमध्ये गांधीजींसोबत सहभागी होऊ लागल्या. जेव्हा पण गांधीजींना तुरुंगात टाकले जायचे तेव्हा कस्तुरबा त्यांची जागा घ्यायच्या. तसेच त्यांनी अनेक गावांना भेट दिलीत व महिलांना प्रोत्साहीत केले. कस्तुरबा गांधी एक महिला स्वातंत्र्य सेनानी आणि राजकीय कार्यकर्त्या होत्या.

बिहारमध्ये 1917 मध्ये चंपारण चळवळ सुरू झाली त्यावेळेस कस्तुरबांनी सक्रिय भूमिका बजावली. तसेच त्यांनी महिलांच्या कल्याणासाठी काम केलेत. गरीब मुलांना शिकवले. कस्तुरबा लोकांना नेहमी जागृत करायच्या. कस्तूरबांना 1932 मध्ये सतत क्रांतिकारी कार्यात भाग घेतल्याबद्दल तुरुंगवास भोगावा लागला.

लहानपणापासूनच कस्तुरबा गांधी यांना क्रॉनिक ब्रॉंकायटिसचा त्रास होता. तसेच पुढे त्यांची प्रकृती ढासळू लागली. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचे दोन झटके आले. 22 फेब्रुवारी 1944 मध्ये पुणे येथील आगा खान पॅलेसमध्ये त्याचे निधन कस्तुरबा गांधी या अनंतात विलीन झाल्यात. कस्तुरबा गांधींचे भारताच्या स्वतंत्र्यासाठीचे योगदान खूप मोठे आहे.

## लाडकी बहीण योजनेच्या अपात्रांची संख्या ९ लाखांवर

मुंबई: मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अपात्र लाभार्थीची संख्या आणखी वाढणार आहे. राज्यात सुरू असलेल्या छाननी प्रक्रियेनंतर चालू महिन्यात आणखी चार लाख महिलांची संख्या कमी होणार आहे. यापूर्वी ५ लाख महिलांना अपात्र ठरवले होते. आता आणखी चार लाखांची भर पडल्याने ९ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. त्यामुळे सरकारच्या ९४५ कोटी रूपयांची बचत होणार असल्याची माहिती मिळत आहे. साधारण २ कोटी ३१ लाख ८६० महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या होत्या. 152 पण, चालू फेब्रुवारीत राज्यातील विविध जिल्ह्यांत करण्यात आलेल्या छाननी प्रक्रियेत अपात्रांच्या संख्येत भर पडली आहे. मुख्यमंत्री योजनेसाठी असे आहेत नवे निकष माझी लाडकी बहीण योजनेसाठी सरकारकडून नवे निकष लागू करण्यात लाभार्थी महिलांना दरवर्षी जून महिन्यात बँकेत ई-केवायसी करून हयातीचा दाखला जोडावा लागणार आहे. १ जून ते १ जुलै दरम्यान ई-केवायसी करावी लागेल. ज्या महिला विविध सरकार योजनांचा लाभ घेतात आणि ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक आहे, त्यांना येतील. बहोण योजना योजनेतून अपात्र केले जाणार आहे. लाभार्थी महिलांचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक आहे की नाहे, हे तपासण्यासाठी सरकार आयकर विभागाची मदत घेणार आहे. नव्याने पात्र झालेल्या आणि नव्याने आधार जोडणी केलेल्या लाभार्थ्यांना यापूर्वीच्या महिन्यांचा लाभ न देता अर्ज मंजूर झाल्याच्या पुढील महिन्यापासून लाभदेण्यास सुरुवात केली जाईल. त्यासह ज्यांच्या घरी चार चाकी वाहन आहे, त्या महिलांना लाभ मिळणार आहे. सरकारी नोकरीत असणाऱ्या महिलांना वगळण्यात येईल.

## श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट कल्याण द्वारा गरजूंना अन्नधान्य वितरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट कल्याण द्वारा अन्न क्षेत्रात सालाबादप्रमाणे शिवजयंतीच्या दिवशी यंदाही संस्था संचालक व मान्यवरांच्या हस्ते गरजू लोकांना अन्न धान्य सामानचे वितरण करण्यात आले.

लोटस होस्पिटल समोर , आधार वाडी जवळ येथे असलेल्या अन्न क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून दररोज गरजू लोकांना भोजन व दरमहा अन्न धान्य सामानाचे वितरण करण्यात येत आहे. या संस्थाचे सेवा कार्य मानव सेवा हीच प्रभु सेवा ह्या पू. डोंगरे महाराज ह्यांनी दिलेल्या सुत्रांच्या प्रेरणेने होत आहे. यासाठी रामकृष्ण सेवा संस्थाचे संचालक जसु चंदाराणा, व विनु तन्ना मेहेनत घेत आहेत. ह्या कामी छबिल कारीया, मितुल देसाई, वन्स चंदाराणा, सुभाष रायचूरा,राजिव चंदाराणा, नटु खीमानी, विष्णूकुमार चौधरी,रश्मी चंदाराणा, मोनीश चंदाराणा, व कल्याण शहराचे प्रख्यात डॉ.तेलवणेच्या हस्ते अर्जुना अन्न धान्याचे किट वितरण करण्यात आले.



## निरंकारी मिशनच्या 'प्रोजेक्ट अमृत'चा तिसरा टप्पा

### मुंबई महानगर प्रदेशात ५० ठिकाणी अभियानाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संत निरंकारी मिशनची सेवा भावना आणि मानव कल्याणाचा संकल्प साकार करण्याच्या हेतुने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' परियोजनेच्या तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ रविवार, दि.23 फेब्रुवारी रोजी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या सान्निध्यात यमुना नदीच्या छठ घाट, आई.टी.ओ., दिल्ली येथे केला जात आहे. जल संरक्षण व स्वच्छतेच्या प्रति जागरूकता निर्माण करणे हा या परियोजनेचा उद्देश आहे, जेणेकरुन भावी पिढ्यांना निर्मळ जल आणि स्वस्थ पर्यावरणाचे वरदान प्राप्त होऊ शकेल.

मुंबई महानगर प्रदेशात जवळपास 50 ठिकाणी हे अभियान राबविण्यात येत असून त्यामध्ये हजारोंच्या संख्येने निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक व अन्य भक्तगण भाग घेणार आहेत. त्यामध्ये मुंबई शहर, उपनगर, नवी मुंबई, उरण, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापुर, भाईंदर तसेच वसई-विरार यांसारख्या भागांचा समावेश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या प्रेरणादायक शिकवणूकींना आत्मसात करत वर्ष 2023 मध्ये संस्कृति मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहयोगाने 'प्रोजेक्ट अमृत'चा शुभारंभ केला गेला. या दिव्य पुढाकाराचा उद्देश केवळ जलस्रोतांची स्वच्छता सुनिश्चित करणे इतकाच नसून जल संरक्षणाला मानवी जीवनाचे अभिन्न अंग बनविण्याचा विचार विकसित करणे हा आहे. नद्या, सरोवरे, तलाव, विहिरी आणि झरे यांसारख्या प्राकृतिक जलस्रोतांची स्वच्छता व संरक्षणाला समर्पित या महाअभियानाच्या पहिल्या दोन टप्प्यांना अभूतपूर्व यश प्राप्त झाले आहे. याच प्रेरणेतून यावर्षी तृतीय टप्पा अधिक व्यापक, प्रभावी व दूरगामी दृष्टीकोनातून वाढविण्यात आला आहे ज्यायोगे हे अभियान सातत्याने विस्तारीत होऊन समाजामध्ये जागरुकता, सेवा आणि समर्पणाची एक सशक्य लाट उत्पन्न करु शकेल. संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले, की हे बृहत अभियान देशभरातील 27 राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील 900 पेक्षा अधिक शहरांमध्ये 1600हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित करण्यात येईल. या महाअभियानाची ही अभूतपूर्व व्यापकता त्याला एक ऐतिहासिक स्वरूप देईल ज्यातून जल संरक्षण व स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावशाली रीतीने जनसामान्यांपर्यंत पोहचू शकेल.

## ठाकूर श्यामनारायण डिग्री कॉलेजचा ऑब्स्क्युरा चित्रपट महोत्सव यशस्वीरित्या साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कांदिवली : BAMMC च्या उत्साही व सर्जनशील विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला आंतरमहाविद्यालयीन चित्रपट महोत्सव ऑब्स्क्युरा २१ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत चालला. या कार्यक्रमात चित्रपटाच्या माध्यमातून कथाकथनाची ताकद दाखविण्यात आली आणि इच्छुक विद्यार्थी चित्रपट निर्माते, सिनेप्रेमी आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी उत्स्फूर्त गर्दी केली. टीएसडीसीचे प्राचार्य डॉ. जी. डी. गिरी व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने दिवसाची सुरुवात झाली आणि प्राचार्य सरांचे मुख्य भाषण झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या चित्रपटांचे प्रदर्शन, विचारप्रवर्तक माहितीपटांपासून प्रायोगिक लघुपटांपर्यंत विविध प्रकारचे सादरीकरण करण्यात आले, ज्यात तरुणांची सर्जनशीलता आणि प्रतिभा प्रतिबिंबित होते प्रदर्शित झालेल्या चित्रपटांमध्ये प्रेक्षक उत्साहाने गुंतले. सर्वोत्कृष्ट लघुपट सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, सर्वोत्कृष्ट संपादक आणि सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफी अशा श्रेणींमध्ये उत्कृष्ट चित्रपटांचा गौरव करून पुरस्कार सोहळ्याचा समारोप करण्यात आला. विजेत्या संघांना टाळ्यांचा कडकडाट आणि कौतुकाचा वर्षाव करण्यात आला, ज्यामुळे यश आणि प्रेरणेचा उच्चांक गाठला गेला. विद्यार्थी संयोजकांनी उल्लेखनीय टीमवर्क आणि नेतृत्वाचे प्रदर्शन केले आणि सर्व सहभागींसाठी एक संस्मरणीय अनुभव सुनिश्चित केला. ऑब्स्क्युरा ने केवळ चित्रपट निर्मितीची कला साजरी केली नाही तर उत्कट कथाकारांचा समुदाय देखील जोपासला आणि उपस्थित प्रत्येकावर कायमचा प्रभाव टाकला. हा माध्यम महोत्सव यशस्वी करण्यासाठी BAMMC समन्वयक नेहा चौहान, प्रमोद गायकवाड, क्षिप्रा सिंग, तन्वी राऊत आणि BAMMC विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.



## शिक्षक क्षमता वृद्धीसाठी तालुका स्तरावर प्रशिक्षण | २२३ शिक्षक सहभागी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची अंमलबजावणी सुरू झाली आहे त्या अनुषंगाने शिक्षकांच्या क्षमता वृद्धीसाठी निवडक विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन पेण पंचायत समितीच्या वतीने पेण तालुक्यातील १०८ प्राथमिक व ११५ माध्यमिक अशा २२३ शिक्षकांसाठी के.ई.एस.लिटिल एंजल स्कूल पेण येथे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आला आहे. या प्रशिक्षणाचे उद्घाटन पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील पहिली ते बारावी वर्गांना शिकवणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले असून या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर, शालेय शिक्षण प्रक्रिया, क्षमता आधारित मूल्यांकनाची कार्यनीती प्रश्न निर्मितीचे प्रकार क्षमता आधारित प्रश्न निर्मिती कौशल्य उच्चस्तरीय विचार प्रवर्तक प्रश्न शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासक आराखडा यासारख्या विविध घटकांचा समावेश करण्यात आला असून या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शासकीय आणि खाजगी अनुदान शाळेतील पहिली ते बारावीच्या सर्व शिक्षकांचे सक्षमीकरण करणे हा एकच उद्देश असल्याचं प्रशिक्षणाच्या वेळी सांगण्यात आले. यावेळी तज्ञ मार्गदर्शनाचे काम जितेंद्र म्हात्रे ,अशोक जेडगुळे, लालू खामकर, प्रवीण मगर, राजू चव्हाण, हरिष शिरगावकर, हेमांगी मनकावले संध्या मोहिते या तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व पेण पंचायत समिती समन्वयक आणि व्यवस्थापक निलेश मानकवले पुरुषोत्तम म्हात्रे हितेंद्र म्हात्रे करुणा भोईर हर्षला शेडगे यांनी उत्तम व्यवस्था केली होती.



उप शिक्षणाधिकारी संतोष शेडगे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी सांगितले की शैक्षणिक क्षेत्रात बदल घडवण्यासाठी शैक्षणिक लाटेत सामील होऊन आपण संस्कारक्षम पिढी तयार करून या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी नवीन ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा आनंद लुटा व ज्ञानाची शिदोरी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून शाळेत आलेला मुलगा शिकला पाहिजे व टिकला पाहिजे यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.
- गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे

## दंड भरून मोटरसायकल चालक झाला हैराण

### मात्र त्याच्या तक्रारीकडे पोलिसांचं दुर्लक्ष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : वाहतुकीचे नियम मोडतोय एक जण आणि त्याचा दंड भरतोय दुसराच, असा प्रकार आता उल्हासनगरमध्ये समोर आलाय. वाहतूक विभागाचा दंड भरून मोटरसायकल चालक हैराण झाला असून त्याच्या तक्रारीकडे मात्र वाहतूक पोलीस दुर्लक्ष करतायत.




उल्हासनगर कॅम्प २ मध्ये राकेश कारीरा नामक राहत असून त्यांची MH 05 DX 6240 क्रमांकाची पांढरी ऍक्टिव्हा दुचाकी आहे. या गाडीला दंड लागल्याचे मेसेज कारीरा यांना दर महिन्याला येतात. मात्र दंडाच्या पावतीसोबत आलेला फोटो ओपन करून पाहिला असता त्याच नंबरची मरून रंगाची बर्गमॅन स्कुटर दिसते. त्यामुळं कारीरा यांच्या गाडीचा नंबर लावून बर्गमॅन चालक गाडी चालवत असल्याचं समोर आलंय. कल्याण परिसरात गाडीला हे दंड लागत असून २०२२ पासून हा दंड मात्र कारीरा यांना भरावा लागतोय. याबाबत त्यांनी वाहतूक पोलिसांकडे तक्रारही केली, पण पोलिसांकडून योग्य सहकार्य आणि प्रतिसाद मिळत नसल्याची कारीरा यांची तक्रार आहे.उल्हासनगर वाहतूक विभागाने काही दिवसांपूर्वी एकाच क्रमांकाच्या रिक्षा पकडून बनावट नंबर प्लेट लावणाऱ्यावर कारवाई केली होती. पण आता कारीरा यांच्या तक्रारीची दखल मात्र पोलीस घेत नसल्यानं कारीरा त्रासले आहेत.

## अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत शिवजयंती साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण: अनुदानित आदिवासी आश्रमशाळा खडावली या शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 395 व्या जयंतीनिमित्त येथील परिसरात वेशभूषेत पदयात्रा काढून ढोल, ताशा व लेझीमच्या तालावर उत्साहाने शिवजयंती साजरी करण्यात आली.

शाळेचे अधीक्षक पंकज नाना पाटील यांच्या मार्गदर्शनाने हा शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांची भाषणे झाली व शाळेचे मुख्याध्यापक दीपक चव्हाण व प्राथमिकविभागाचे मुख्याध्यापक शरद गोतारणे तसेच माध्यमिक विभागातील शिक्षक जगदीश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. तर कार्यक्रम समारोप करताना प्राथमिक विभागातील शिक्षक नामदेव भोईर यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक घटना विद्यार्थ्यांना उदघोषित केल्या.

याकार्यक्रम प्रसंगी माध्यमिक मुख्याध्यापक दीपक चव्हाण, प्राथमिक मुख्याध्यापक शरद गोतरणे आदी शिक्षक शिक्षकेतर व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक महेंद्र चंदे यांनी केले.



जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# रेल्वेच्या जनरल तिकीट नियमांमध्ये बदल ?

## रेल्वे प्रवाशांवर होणार परिणाम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भारतात दररोज कोट्यावधी लोक रेल्वेने प्रवास करतात. खरंतर रेल्वे भारताची जीवनवाहिनी आहे. मोठ्या शहरांत तर चाकरमान्यांना रेल्वेचाच आधार आहे. अनेक जण रिजर्व कोचमधून प्रवास करतात. तर काही जण अनारक्षित डब्यांतून प्रवास करतात. यासाठी फार आधी तिकीट घेण्याची गरज नसते. तुम्ही स्टेशनवर पोहोचलात की काही वेळातच तुम्हाला तिकीटही मिळते. परंतु, आता जनरल डब्यांतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वे नियमांत बदल करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. याला कारण ठरली आहे नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवरील चेंगराचेंगरीची घटना.



मागील आठवड्यात नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरी झाली होती. या दुर्घटनेत 18 लोकांचा मृत्यू झाला होता. तर अनेक जण जखमी झाले होते. या घटनेत रेल्वेवर प्रचंड टीका झाली होती. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे.

चेंगराचेंगरी का झाली, यामागे नेमकं काय कारण होतं याची चौकशी केली जात आहे. यातच आता रेल्वेच्या जनरल तिकीटांच्या बाबतीत नियमांत बदल केले जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. जनरल तिकीट बुकिंगचा जो क्रायटेरिया निश्चित करण्यात आला आहे. त्यात बदल करण्याचा विचार रेल्वे मंत्रालय करत असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आता जनरल तिकीटांवर रेल्वे गाड्यांची नावे टाकण्यात येतील. सध्या जनरल तिकीटांवर रेल्वे गाड्यांची नावे नसतात. त्यामुळे प्रवाशांचा मोठा गोंधळ होतो. अनेकांना तिकीट कोणत्या ट्रेनचं आहे, ट्रेन कोणत्या ठिकाणी थांबणार याची माहिती होत नाही. तिकीटावर रेल्वेचे नाव नसल्याने एखादा प्रवासी आधीची ट्रेन बदलून दुसऱ्या ट्रेननेही प्रवास करू शकतो. या नियमात बदल होऊन जर रेल्वे तिकीटांवर रेल्वेगाडीचं नाव आलं तर प्रवाशांना अशी चालाखी करताच येणार नाही.

रेल्वेकडून देण्यात येणाऱ्या जनरल तिकीटांची ठराविक मुदत असते. हा नियम बहुतेक लोकांना माहिती नाही. तिकीट घेतल्यानंतर जर तीन तासांच्या आत प्रवास सुरू केला नाही तर तिकीट अमान्य ठरते. त्यामुळे या तिकीटावर प्रवाशांना प्रवास करता येणार नाही. या नियमाची माहिती अनेकांना नसते. त्यामुळे अनेकदा प्रवासी तिकीट तापसणीसाशी हुज्जत घालताना दिसतात.

# राज ठाकरेंनी घेतली मुंबई पालिका आयुक्तांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबई महापालिकेच्या कार्यालयात जावून महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतली. राज ठाकरे यांनी यावेळी महापालिका आयुक्तांसोबत दोन महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. याबाबत स्वत: राज ठाकरे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी नेमकी काय चर्चा झाली, या विषयी माहिती दिली. यावेळी राज ठाकरे यांनी पत्रकारांना एक प्रश्न विचारला. "किती वर्षांने या वास्तूत आलात?", असा प्रश्न राज ठाकरेंनी पत्रकारांना विचारला. "मीच जवळपास चार-पाच वर्षांनी येत असेल", असं राज ठाकरे यावेळी म्हणाले. "मी मुंबई महापालिका आयुक्तांच्या कानावर दोन विषय घातले आहेत. एक म्हणजे मुंबई शहराच्या जमिनीखालून जाणाऱ्या ज्या जमिनी आहेत, मग त्या रिलायन्सच्या असतील, अदानीच्या असतील किंवा इतर कंपन्यांच्या असतील, आज मुंबई महापालिकेची एकूण आर्थिक परिस्थिती चांगली नाही. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून येणारे पैसे हे महापालिका का घेत नाही? त्यांनी आता सांगितलं की तो राज्य सरकारने निर्णय केलेला आहे. पण मला असं वाटतं की, आता आयुक्तांकडून राज्य सरकारला त्याबाबतचं पत्र जाईल आणि महापालिकेला मिळणारे पैसे हे घालवू नयेत अशी आमची इच्छा आहे. एकतर जीएसटी नंतर ऑक्ट्रा बंद झाला आहे. त्यामुळे महापालिकेवर खूप ताण आहे. तो एक विषय होता", असं राज ठाकरे म्हणाले.

"तुम्ही सगळ्यांना कर लावणार मग या कंपन्यांना का नाही? बरं या काही धर्मदाय संस्था नाहीत. त्या त्यांचा प्रॉफीट घेतच आहेत. पैसे कमावतच आहेत. मग महापालिकेने यांच्याकडून पैसे का घ्यायची नाहीत? एवढा फक्त विषय आहे. मला असं वाटतं आयुक्त त्यावर काम करतील. हा राज्य सरकारने घेतलेला निर्णय असल्याने आयुक्तांची नोट राज्य सरकारला जाईल त्यानंतर मी मुख्यमंत्र्यांसोबत बातचित करेन. पुढे काय होईल ते मला माहिती नाही", अशी प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली.

# डोंबिवलीतील रहिवाशांना बेघर होऊ देणार नाही – श्रीकांत शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण**-डोंबिवलीतील ६५ इमारतींमधील रहिवाशांना बेघर होऊ देणार नाहीशिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे रहिवाशांना आश्वासनन्यायालयात पुन्हा नव्याने बाजू मांडण्यासाठी वकिलांची टीम देणारमुंबई, ता. २० फेब्रुवारी २०२५कल्याण डोंबिवलीतील ६५ अनधिकृत इमारतींमधील रहिवाशांना बेघर होऊ देणार नाही. त्यांची बाजू कोर्टात नव्याने मांडण्यासाठी सरकारकडून वकिलांची टीम दिली जाईल आणि यावर मार्ग काढला जाईल, असे आश्वासन कल्याणचे शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आज दिले. या इमारतींमधील रहिवाशांनी आज खासदार डॉ. शिंदे यांची मुंबई येथे भेट घेतली. यावेळी खासदार शिंदे यांनी रहिवाशांच्या अडचणी समजून घेतल्या. उच्च न्यायालयाने कल्याण डोंबिवलीतील ६५ अनधिकृत इमारती तोडण्याचे आदेश कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला दिले आहेत.

या ६५ इमारतींमधील ६५०० कुटुंबांवर बेघर होण्याची टांगती तलवार आहे. या पार्श्वभूमीवर या इमारतींमधील रहिवाशांनी आज खासदार डॉ. शिंदे यांची भेट घेतली.



यावेळी पत्रकारांशी बोलताना खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, ६५ इमारती तोडण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. या इमारतींमधील रहिवाशांनी जेव्हा घरे घेतली तेव्हा त्यांना 'केडीएमसी'च्या खोट्या परवानग्या दाखवून फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी बिल्डरांना जबाबदार धरायला हवे, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. या लोकांना बेघर करु देणार नाही, याला आमचे प्राधान्य आहे. यासाठी वकिलांची एक टीम रहिवाशांना उपलब्ध करुन देऊ. कोर्टात पुन्हा कशाप्रकारे नव्याने बाजू मांडता येईल याबाबत चर्चा सुरु आहे, अशी माहिती खासदार डॉ. शिंदे यांनी दिली. महायुती सरकार आहे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास खाते आहे. त्यामुळे सरकार या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा काढेल आणि रहिवाशांना दिलासा देईल, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, यापूर्वीही कल्याण डोंबिवलीमध्ये अशा प्रकारच्या घटना घडल्या होत्या. त्या त्या वेळी सरकार रहिवाशांच्या पाठिशी उभे राहिले होते. सरकारने २७ गावांचा ५०० कोटींचा कर माफ केला होता तसेच या गावांसाठी क्लस्टर योजना राबवली होती. उल्हासनगरमधील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी वेगळा यूडीसीपीआर आणला होता. म्हाडाच्या प्रश्नामध्ये तेथील रहिवाशांना दोन हप्ते माफ करण्याचे काम सरकारने केले होते. यापूर्वी असे प्रश्न निर्माण झाले होते. त्यावेळी सरकारने पूर्ण ताकदीनिशी या प्रकरणातून मार्ग काढला होता. आताही सरकार पूर्णपणे या रहिवाशांच्या पाठिशी आहे, अशी ग्वाही खासदार डॉ. शिंदे यांनी दिली. हा लोकांच्या घरांचा विषय आहे. अनेक वर्ष लोक घरांचे स्वप्न पाहता आणि आयुष्याची जमापुंजी खर्च करुन घर विकत घेतात. त्यामुळे यात कोणीही राजकारण करु नये, असे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. राज्यात महायुतीने लाडकी बहिण योजना राबवली. तशाच प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीची धुरा महिलेच्या हाती देण्याचे ठरवले आहे. त्यामुळे रेखा गुप्ता यांच्या नेतृत्वात दिल्लीचे प्रदूषण, यमुना नदी स्वच्छता अशा समस्या सुटतील, असे ते म्हणाले. अडीच वर्षात एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना जे काम केले त्यावर विश्वास ठेवून लोक शिवसेनेत येत आहे. येत्या काळात आणखी दिग्गज लोक शिवसेनेत प्रवेश करतील, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ईमेलमधून मिळालेल्या धमकीबाबत सरकारकडून चौकशी सुरु आहे. यामागे कोण आहे हे लवकरच कळेल, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

# मृतदेहाच्या पंचनाम्यास गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यास लोकलची धडक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रेल्वे ट्रॅकच्या लगत सापडलेल्या तरुणीच्या मृतदेहाचा पंचनामा करताना लोकल ट्रेनची धडक बसल्यामुळे रेल्वेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मध्य रेल्वेच्या तानशेत खर्डी स्टेशन दरम्यान रात्री बारा वाजताच्या सुमारास एका तरुणीचा मृतदेह आढळल्याची माहिती कल्याण रेल्वे पोलिसांना मिळाली. या मृतदेहाचा पंचनामा करण्यासाठी कल्याण रेल्वेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास गरजे घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करत असताना अचानक दोन्ही बाजूंनी आलेल्या लोकलचा अंदाज न आल्याने गरजे यांना लोकलची धडक लागल्याने ते गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. जखमी गरजे



यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती कल्याण रेल्वेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ कांदे यांनी दिली.

आसनगाव रेल्वे स्थानकाजवळ दोन दिवसापूर्वी आकांक्षा जगताप या तरुणीचा मृतदेह सापडला होता. त्यातच काल रात्री उशिरा तानशेत खर्डी दरम्यान रेल्वे ट्रॅक लगत एक तरुणी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती रेल्वे मोटरमनकडून रेल्वे पोलिसांना देण्यात आली. कल्याण रेल्वे पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने घटनास्थळाकडे कूच केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास गर्जे पहाटेच्या अंधारात घटनास्थळी पंचनामा करत असताना अचानक दोन्ही बाजूंनी एकाच वेळी लोकल आल्या. यामुळे लोकलची धडक लागून गर्जे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# वाघाचे कातडे पांघरुन लांडगा वाघ होत नाही

## – एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
देवरी, गोंदिया,
ता. २१ फेब्रुवारी २०२५

काहीजणांचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. ते आता डोकी फोडण्याची भाषा करत आहेत. मात्र शोले सिनेमातील असरानीप्रमाणे ज्यांची परिस्थिती आहे त्यांनी अशी भाषा करु नये. आव्हान देण्यासाठी मनगटात ताकद असावी लागते. वाघाचे कातडे पांघरुन लांडगा वाघ होत नाही, असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केला. ते लोकसभेत हरले, विधानसभेत हरले आणि आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्येही त्यंचा पराभव होणार, असे शिंदे म्हणाले. विदर्भातील देवरी, गोंदिया येथे आयोजित आभार सभेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे माजी आमदार सहसराम करोटे यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी व्यासपीठावर मंत्री संजय राठोड, शिवसेना आमदार नरेंद्र भोंडेकर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी यांची महालाट आली आणि त्यात भलेभले वाहून गेले. काहीजण म्हणाले होते, तुमचा एकही आमदार निवडून येणार नाही. पण विधानसभेतील भाषणात २०० हून अधिक जागा निवडून आणू, अशी मी घोषणा केली होती. निवडणुकीत मी आणि देवेंद्र फडणवीस यांनी मिळून महायुतीच्या २३२ जागा निवडून आणल्या. मागील अडीच वर्ष पायाला भिंगरी लावून महाराष्ट्रभर काम केले. विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना सुरु केल्या. अडीच वर्षापूर्वी महाविकास आघाडीने बंद केलेल्या सर्व योजना सुरु केल्या, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या मतदार संघात मुख्यमंत्री असताना ३५०० ते ४००० कोटींचा निधी विकास कामांसाठी दिला, असे ते म्हणाले. नरेंद्र भोंडेकर आणि त्यांची टीम मिळून आपल्याला विदर्भासाठी काम करायचे आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले की सत्ता येते आणि जाते, पदं येतात आणि जातात, पुन्हा पदं मिळतात, मात्र लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ म्हणून मिळालेली ओळख ही सगळ्या पदांपेक्षा मोठी आहे. शरिरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत महाराष्ट्राला समर्पित काम करेन, असा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केला. मी पदासाठी आणि खुर्चीसाठी कदापी कासावीस झालो नाही आणि होणार नाही. मला काय मिळालं यापेक्षा महाराष्ट्रातील तमाम जनतेला काय मिळाल हे पाहणारा मी आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये सोन्याचे दिवस आणण्यासाठी आमचा जन्म झालेला आहे. लोक शिवसेनेत येत आहे कारण हा पक्ष सामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. शेअर मार्केटमध्ये जसा गुंतवणूकदारांचा विश्वासावर चालते तसे शिवसेनेचे आहे. तुमचा विश्वास कदापी तुटू देणार नाही, असे शिंदे म्हणाले.

> **"मी सगळ्या धमक्यांना पुरुन उरणारा आणि पाठिशी उभा राहणारा आहे**
>
> उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की मी बाळसाहेब आणि आनंद दिघे यांचा कार्यकर्ता आहे. आनंद दिघे असताना डान्स बार, लेडिज बार बंद केले होते. त्यावेळीही अनेक धमक्या आल्या होत्या. गडचिरोलीचा पालकमंत्री असताना नक्षलवाद्यांनी धमक्या दिल्या मात्र त्या नक्षलवाद्यांना कंठस्नान घालून यमसदनी पाठवण्याचे काम गडचिरोलीच्या पोलीसांनी केले. त्याचा आपल्याला अभिमान आहे, असे शिंदे म्हणाले. मी धमक्यांना घाबरणारा नाही तर पुरुन उरणारा आहे, असा पुनरुच्चार शिंदे यांनी यावेळी केला. कोविड काळात पीपीई कीट घालून रुग्णांना आणि डॉक्टरांना दिलासा दिला. जोवर ही जनता पाठिशी हा तोवर जीवाला सोडा दाढीच्या केसालाही धक्का लागणार नाही, असे ते म्हणाले.

# कल्याण-तळोजा मेट्रोच्या कामाला वेग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ठाणे आणि नवी मुंबई मेट्रोने जोडण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) 'कल्याण – डोंबिवली – तळोजा मेट्रो १२' मार्गिकेच्या उभारणीचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकेच्या कामाला मार्च २०२४ मध्ये सुरुवात झाली असून ११ महिन्यांच्या कालावधीत 'मेट्रो १२' मार्गिकेचे ७ टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गिकेचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. त्यानुसार आता कामाला वेग देण्यात आला असून लवकरच या मार्गिकेतील निळजे कारशेडच्या कामालाही सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. यासाठी येत्या काही दिवसातच कारशेडच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

एमएमआरडीएच्या ३३७ किमी लांबीच्या मेट्रो प्रकल्पातील 'कल्याण – तळोजा मेट्रो १२' मार्गिका एक महत्त्वाची मार्गिका आहे. ही मार्गिका ठाणे आणि नवी मुंबई अशा दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणार आहे. 'ठाणे – भिवंडी – कल्याण मेट्रो ५' मार्गिकेचा विस्तार 'मेट्रो १२' मार्गिकेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. २०.७५ किमी लांबीची आणि १९ मेट्रो स्थानकांचा समावेश असलेली ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्यास कल्याण – डोंबिवली – नवी मुंबई अंतर अवघ्या काही मिनिटांत पार करण्यात येणार आहे. 'मेट्रो १२' मार्गिकेच्या कामाला मार्च २०२४ मध्ये सुरुवात करण्यात आली असून गेल्या ११ महिन्यांच्या कालावधीत या मार्गिकेचे केवळ ७ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरडीएतील सूत्रांनी दिली. आता एमएमआरडीएने 'मेट्रो १२'च्या कामाला गती दिली आहे. त्यामुळे या मार्गिकेचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण होईल, असा विश्वासही सूत्रांनी व्यक्त केला. मेट्रो १२ मार्गिकेचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करून ती वाहतूक सेवेत दाखल केली जाणार आहे. त्यामुळे ठाणे – कल्याण – डोंबिवली – नवी मुंबई असा मेट्रो प्रवास करण्यासाठी ठाणेकर आणि नवी मुंबईकरांना जानेवारी – फेब्रुवारी २०२८ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. दरम्यान, 'मेट्रो १२' मार्गिकेच्या कामाला वेग देतानाच दुसरीकडे या मार्गिकेच्या निळजे कारशेडच्या कामालाही लवकरात लवकर सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

'मेट्रो १२'साठी निळजे-निळजेपाडा येथील ४५ हेक्टर जागेवर कारशेड बांधण्यात येणार आहे. या जागेचा ताबा एमएमआरडीएने घेतला आहे. आता प्रत्यक्ष कारशेडच्या कामाला सुरुवात करण्याच्यादृष्टीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम सुरू आहे. येत्या काही दिवसांतच कारशेडच्या कामासाठी निविदा मागविण्यात येतील आणि त्यानंतर कारशेडच्या कामाला सुरुवात होईल, असेही सूत्रांनी सांगितले.

# अजित दादांचे दोन मंत्री विरोधकांच्या रडारवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रात सध्या चर्चेत असणाऱ्या मुद्द्यांमध्ये राजकारणातून काही नावांची चर्चा सुरू असून त्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्षसुद्धा चर्चेचा विषय ठरत आहे. अजित पवारांचे दोन मंत्री विरोधकांच्या टार्गेटवर आहेत. त्यांची नावं आहेत धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे. या दोन्ही मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. नैतिकतेच्या आधारावर अजित पवारांच्या दोन्ही मंत्र्यांचा राजीनामा फडणवीसांनी घ्यावा अशी मागणी राऊतांनी केली आहे.

राऊतच नव्हे तर, एखाद्यानं केलेल्या कृत्यामुळे संघटना, पक्ष आणि राज्याची बदनामी होत असेल तर राजीनामा दिला पाहिजे असा टोला सुप्रिया सुळे यांनीही लगावला आहे. दरम्यान यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिलीय. 1995 मधील सदनिका घोटाळा प्रकरणी माणिकराव कोकाटेंना नाशिक न्यायालयानं 2 वर्षांची शिक्षा सुनावली. दरम्यान यानंतर लगेचच त्यांना जामीन देण्यात आला. मात्र, त्यांनी केलेल्या या फेरफारीचं बिंग फुटलंय ते एका बंदुकीसाठी केलेल्या अर्जामुळे.

**बंदुकीसाठी अर्ज, काटेंचं बिंग फुटलं!**

1994 मध्ये कोकाटेंनी रोख रक्कम हाताळणीच्या सुरक्षेसाठी बंदुकीचा परवाना मिळवण्यासाठी अर्ज केला होता. अर्जानुसार आपल्याकडे 40 ते 50 कामगार काम करतात, असं त्यांनी परवान्यासाठी अर्ज करताना म्हटलं होतं. कामगारांना प्रत्येक आठवड्याला सुमारे नऊ हजार रुपये रोख स्वरुपात पगार द्यावा लागतो. पैशांच्या सुरक्षतेसाठी बंदुकीच्या परवान्याची मागणी कोकाटेंनी केली होती. दरम्यान यामुळे कोकाटेंचं वार्षिक उत्पन्न 30 हजार रुपयांहून कमी नसल्याचा निष्कर्ष तत्कालीन जिल्हा प्रशासनानं काढला. त्यामुळे कमी उत्पन्न दाखवून कोकाटेंनी कमी दरात सदनिका कशा मिळवल्या असा प्रश्न उपस्थित झाला आणि म्हणूनच माणिकराव कोकाटेंवर कागदपत्र फेरफार आणि फसवणूक प्रकरणी कारवाई करण्यात आली. सुरुवातील बीड हत्या आणि खंडणी प्रकरणी आरोप झालेल्या धनंजय मुंडेंवर आत कृषी खात्यात घोटाळा केल्याचा आरोप करण्यात आलाय. सुरेश धस आणि अंजली दमानियांनी त्यांच्यावर हा गंभीर आरोप केलाय. 200 कोटींचा निधी वळवला, कृषीमंत्री असताना धनंजय मुंडेंनी 300 कोटींचा घोटाळा केला असेही आरोप त्यांच्यावर आहेत राजीनामा आणि नैतिकतेच्या मुद्यावरुन विरोधकांनी सरकार आणि दादांच्या दोन्ही मंत्र्यांना घेरलंय. त्यामुळे मागील अनेक दिवसांपासून सुरु असेलली विरोधकांच्या मागणीला यश मिळणार का? दादा, फडणवीस दोन्ही मंत्र्यांचा राजीनामा घेणार की नाही? हे आगामी स्पष्ट होण्याची दाट शक्यता आहे



# कल्याण स्कायवॉकवर भाजी विक्रेत्यावर हल्ला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : कल्याणातील स्कायवॉकवर दोन अज्ञात चोरट्यांनी भाजी विक्रेत्यावर दगडाचा हल्ला करीत. गंभीर जखमी झालेल्या भाजी विक्रेत्याचे पैसे, मोबाईल लुटून पोबारा केल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी घडला. कल्याण पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या स्कायवॉकवर दोन चोरट्यांनी दगडाचा हल्ला करीत भाजी विक्रेता सुरेश समर बहादूर सिंग यांस गंभीर जखमी करून त्याच्या खिशातून ६ हजार रुपये आणि मोबाईल चोरी करून पोबारा केला.

या हल्यात सुरेश समर बहादूर सिंह भाजी विक्रेता गंभीर जखमी असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी कल्याण कोळसवाडी पोलीसांनी गुन्हा दाखल

### पैसे मोबाईल चोरून अज्ञात चोरट्यांनी केला पोबारा

करीत अज्ञात चोरट्या आरोपीचा शोध सुरू केला असल्याची प्राथमिक माहिती सूत्राकडून मिळाली.स्टेशन परिसरातील स्कायवॉक वर ही गंभीर घटना घडल्याने स्कायवॉक वरून ये जा करणाऱ्या प्रवाशांचा सुरक्षा प्रश्न यानिमित्ताने ऐरणीवर आला आहे.

## संक्षिप्त

### जिल्हास्तरीय महावाचन स्पर्धेत यश पाटील द्वितीय




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण: जिल्हास्तरीय व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेचे आयोजन रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव खालापूर येथे करण्यात आले होते.

महावाचन स्पर्धेचे राज.जि.प.शाळा खारपाडा येथील यश रामचंद्र पाटील याने तीसरी ते पाचवी या गटात जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवल्यामुळे त्याचा सत्कार रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती पुनिता गुरव उपशिक्षणाधिकारी भोपळे साहेब तसेच पेण गटशिक्षणाधिकारी अधिकारी अरुणादेवी मोरे जिते केंद्रप्रमुख मुकुंद पाटील, जोहे, कोपर केंद्रप्रमुख प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत विशेष सत्कार करण्यात आला.

खारपाडा शाळा नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत असल्याने सर्व क्षेत्रात नावलौकिक होत आहे. काही दिवसांपूर्वीच याच शाळेचे सहा विद्यार्थी राज्याबाहेरील अभ्यास दौरा भोपाळ या ठिकाणी करुन आले. सदर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून शाळेचे मुख्याध्यापक प्रविण पाटील, सहशिक्षिका सौ. नंदिनी कदम, विषय तज्ज्ञ पेण पंचायत समिती हितेंद्र म्हात्रे सर यांनी मोलाचे सहकार्य केले. याला मिळालेल्या यशाबद्दल पेण तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### वडाचापाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ लगत असलेल्या वडाचा पाडा येथे २२ फेब्रुवारी ते मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत तीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे आयोजन करण्यात आला आहे. हनुमान मंदिर कैलास शशी गोपाळ नारायण ईसामे पटांगण वडाचा पाडा येथे हा भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह सोहळा आयोजित करण्यात आला आहे महाराष्ट्रातील तसेच ठाणे जिल्ह्यातील नामवंत प्रवचनकार कीर्तनकार जागर भजन अशा हरिभक्त पारायण यांच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले आहे या सोहळ्यासाठी मुरबाड तालुक्यातील वारकरी संप्रदायातील सर्व भाविक या सोहळ्यासाठी प्रचंड मेहनत घेत असून त्या सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या प्रवचनामध्ये ह. भ. प. सुनील महाराज इसमे शिवळे ह. भ. प. रवींद्र महाराज कापडी कळम खांडे यांचे प्रवचन होणार असून ह. भ. प .ज्ञानेश्वर महाराज पारधी वांद्रे पडघा ह. भ. प. गजानन महाराज काळे शिरूर जिल्हा पुणे तसेच ह. भ. प. बबन महाराज घोरड यांच्या कीर्तन सोहळ्याचा कार्यक्रम होणार असून जागर भजन म्हणून सार्वजनिक जागर भजन मंडळ कळमखंडे सार्वजनिक जागर भजन देहनोली व वडाचापाडा यांचा कार्यक्रम सादर होणार आहे यामध्ये ग्रामस्थ मंडळ वडाचा पाडा व पंचक्रोशीतील सर्व अखिल मुरबाड तालुका परमार्थिक शेतकरी समाज मुरबाड शहापूर, कल्याण तालुक्यातील सर्व वाद्य रुंद मृदुंगमणी अशा सर्वांचे विशेष सहकार्य या भव्य सोहळयासाठी लाभत आहे तरी पंचक्रोशीतील भक्त भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन वडाचापाडा ग्रामस्थांनी केले आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाची कामे पूर्ण करा

## - सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी आज मुंबई गोवा महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. महामार्गावरील प्रत्यक्ष सुरु असलेली कामे, त्यामध्ये होत असलेली दिरंगाई,जमीन हस्तांतरणात येत असलेल्या अडचणी तसेच अन्य सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील. तरी सर्व संबंधित यंत्रणानी महामार्गचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशा सूचना मंत्री भोसले यांनी यावेळी दिल्या.

मुंबई गोवा महामार्गावरील अपूर्ण कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले रायगड आणि रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आहेत. पनवेल येथील पळस्पे फाटा येथून या पाहणी दौऱ्यास सुरुवात झाली. हा महामार्ग एकूण १२ टप्प्यांत विकसित होत आहे.एकूण ४३९.८८ किमीपैकी पळस्पे फाटा (पनवेल) ते हातखांबा (रत्नागिरी) या 281 किलोमीटरच्या पल्यावरील



कामाची पाहणी करणार आहेत..सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिका-यांकडून त्यांनी या टप्प्यातील कामांची सद्यस्थिती, त्यासाठी आवश्यक बाबी यांची त्यांनी माहिती घेतली. ही कामे लवकरात लवकर पुर्ण होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांतील अधिका-यांनी परस्पर समन्वय साधून काम तातडीने पूर्ण करावेत अशा सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी यावेळी दिल्या. या पाहणी दौऱ्यात मंत्री श्री भोसले यांनी पलस्पे फाटा, पेण, वाशीनाका,गडब,आमटेम,नागोठणे, कोलाड,इंदापूर, माणगाव,लोणारे रोड या विविध ठिकाणी सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या सोडविण्यासाठी सर्वोतोपारी सहाय्य करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत मे महिन्याच्या अखेरपर्यंत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाची अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीला फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, खासदार धर्यशील पाटील,आमदार रवींद्र पाटील, सा. बा .(एन एच) मुख्य अभियंता श्री शेलार, मुख्यव्यवस्थापक अंशुमानी श्रीवास्तव,प्रकल्प संचालक यशवंत घोटकर, अधीक्षक अभियंता रा. म.,श्रीमती तृप्ती नाग, सा. बा. अधीक्षक अभियंता श्रीमती सुषमा गायकवाड,कार्यकारी अभियंता श्री सुखदेवे, श्री नामदे यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री भोसले म्हणाले की,महामार्गावर ज्या ठिकाणी पुलांची कामे चालू आहेत त्याठिकाणी सर्व्हिस रोड नीटनीटके व वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवावेत. जेणेकरून पावसाळयापूर्वी व पुढे गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी होणार नाही. इंदापूर व माणगाव बायपास पुलाच्या निविदा प्रक्रियेची कार्यवाही फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होईल. मार्च महिन्यात काम चालू होईल. महामार्गचे काम करतांना ठेकेदाराने केलेल्या कामाचा दर्जा उत्कृष्ट राहील याची विभागाने तपासणी करावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई गोवा महामार्गाचे काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तरी संबंधित सर्व यंत्रणानी दर्जेदार व विहित वेळेत काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत.परस्पर समन्वय साधावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

याबैठकीत उड्डाणपूल, सर्विस रोड, गटारे, पावसाळयात तुंबणारे पाणी, वाहतूक कोंडी, पथदिवे यांसह विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# गंगा माता वाहन संस्थेने गुन्ह्यात जप्त वाहनांचा घेतला शोध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : शहापूर पोलीस ठाणे आवारात असलेल्या गुन्ह्यातील जप्त व अपघातातील बेवारस असलेल्या चारचाकी व दुचाकी या वाहनांच्या मुळ मालकांचा गंगा माता या वाहन संस्थेने शोध लावला आहे. त्यामुळे मालकांना समजपत्र पाठवून सदर वाहनांची कागदपत्रे दाखवून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून वाहन घेऊन जाण्याचे आवाहन शहापूर पोलिस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

शहापूर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गुन्ह्यातील व अपघातातील बेवारस असलेल्या चारचाकी व दुचाकी अशी एकूण 122 वाहने हे बऱ्याच काळावधी पासून पडून आहेत. सदरची वाहने नादुरुस्त व जुनाट तुटफूट झालेल्या अवस्थेत असल्याने मालकांनी कागदपत्रे दाखवून सात दिवसांच्या आत घेऊन जावीत अन्यथा त्या वाहनांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून वाहनांवर योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश पोलिस निरीक्षक



जितेंद्र ठाकूर यांनी जाहीर पत्राद्वारे दिले होते.

परंतु न्यायालयीन प्रक्रिया व बेवारस वाहनांचे मालक मिळून येत नसल्याने हि वाहने मुळ मालकांच्या ताब्यात देण्याचे आदेश प्रभारी अधिकारी यांना दिले असता, पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनानुसार सहा.पो.नि. शिवकुमार जाधव, पो.ह. बी.जे. शेलार, भाऊसाहेब मुंढे, जितेंद्र गिरासे यांचे पथक नेमून आदेश दिले.

सदर, यासाठी गंगा माता वाहन शोध संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांची मदत घेऊन त्यांनी यासंदर्भात सर्व पत्रव्यवहार व बाबी पूर्ण करून वाहनांच्या मुळ मालकांचा शोध लावला आहे. त्यामुळे मालकांना समजपत्र पाठवून सदर पत्र मिळताच वाहनांची कागदपत्रे दाखवून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आठ दिवसांत वाहन घेऊन जावे अन्यथा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांचा लिलाव केला जाईल व त्यातून आलेली रक्कम सरकारी तिजोरीत भरण्यात येईल असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी म्हटले आहे.

# शहापुरात हिरकणी स्पर्धा शहात्तर वर्षांच्या आजीचा सहभाग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : शहापुरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती मार्फत शिवजयंती सोहळयानिमित्ताने घेण्यात आलेल्या हिरकणी स्पर्धेत श्वेताबाई शिंदे या 76 वर्षीय आजीने 22 फूट हिरकणी बुरुज सर करून सहभाग घेऊन यशस्वीपणे ही स्पर्धा पार पाडल्याने त्या आजीवर बक्षिसांचा वर्षाव झाला तर 63 वर्षीय आजीनेही सहभाग घेऊन उपस्थितांची मने जिंकली.चित्ररथ स्पर्धेत ग.वि. खाडे विद्यालय,अर्चना स्कुल व दमानिया स्कुल यांनी प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले असून शिवशंभू प्रतिष्ठान,पीएस देशमुख, जनकल्याण शाळा व महिला मंडळ याना उतेजनार्थ पारितोषिक देण्यात आली.यात वनिता बिन्नर,भारती आवर व वैशाली ढोन्नर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले



स्पर्धेत विजेत्याना रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

तीन दिवस चाललेल्या या शिवसोहळयात नवनीत यशवंतराव यांचे शिवव्याख्यान,अजित भालके यांचा पोवाडा,चित्ररथ, मल्लखांब,संबळ वादन, योगासने व तलावरबाजी यांची प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. मोटार रॅली,हिरकणी स्पर्धा,लेझीम पथक,तलवार पट्टा,शिवजन्मोत्सव सोहळा,दुग्धभिषेक व पूजन व शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणुक शहापूर बाजारपेठेत काढण्यात आली होती. यावेळी समितीचे अध्यक्ष संतोष शिंदे, आमदार दौलत दरोडा,तहसीलदार परमेश्वर कासुळे,पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर ,शारदा बाळयामामा म्हात्रे,गीता दौलत दरोडा दरोडा,रजनी शिंदे,सुमेध जाधव,उदय शेट्टी यांच्यासह राजकीय पक्ष ,मित्र मंडळ,संघटना यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# टिटवाळ्यात योजनेतील घरे आणि बिल्डरांची मनमानी- शिवसेनेची तक्रार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळयातील पंतप्रधान आवास योजना आणि त्यासोबतच बिल्डरांच्या मनमानी कारभारावर शिवसेनेचे उपशहरप्रमुख विजय देशकर यांनी तक्रार नोंदवली आहे. या संदर्भात त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांना निवेदन देत नागरिकांच्या समस्या मांडल्या आहेत.

टिटवाळयातील पंतप्रधान आवास योजनेत घर किंमत १६ लाख ६८ हजार रु.ला विकण्याची अनुमती दिली होती व त्या रक्कमे मधून सबसिडी. २ लाख ५० हजार लाख म्हाडा बिल्डरला देणार होती व ते बिल्डर ने म्हाडा कडून घेतले. त्या अर्थानि घराची किमत घर धारकांना १४ लाख १८ हजार इतकी होणे अपेक्षित होती. पण बिल्डरने




पंतप्रधान आवास योजनेच्या नावावर मनमानी करत घर खरेदी खरेदी करणा-या ग्राहकांकडून १६लाख १८ हजार, १७ लाख १८ हजार, १७ लाख ९९ हजार अश्या पद्धतीच्या रक्कम आकारली आहे. परीसरातील रुस्तगी एस्टेट प्रा..लि ह्या विकासकाच्या माध्यमातुन रुस्तगी आरंभ हे रहीवासी वापर करता गृहसंकुलाचे काम टिटवाळा येथे सुरु असुन त्याची नोंद महारेरा ACT-२०१६ या कायद्याप्रमाणे P51700033998 / P51700034204 / P51700034078. या क्रमांकाने झाली आहे हा प्रकल्प MHADA ने मान्यता प्रदान केलेला [ schem - Affordable Housing properties - public partner partnership - AHP-PPP असुन] आर्थिक दुष्टया मागास प्रवर्ग व अल्प उत्पन्न गटासाठी उभारले जात आहेत. सदर प्रकल्पात ज्या ग्राहकांनी कायम खरेदी विक्री करारनामान्याने विकत घेतली आहे. मात्र सदर विकासकाने त्या ग्राहकांना बेकायदेशीर व अनधिकृतपणे खंडणीची / दंडनीय नोटीस पाठवली असल्याची तक्रार देशेकर यांनी घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्यावतीने महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

५५० च्या वर ग्राहकांची फसवणूक पंतप्रधान आवास योजनाच्या नवाखाली बिल्डर करत असल्याचा आरोप त्यांनी आपल्या पत्रातून केला आहे.

पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे घेतलेल्या नागरिकांना योग्य किंमतीत घरे मिळावीत. बिल्डरांच्या मनमानी कारभारावर अंकुश ठेवण्यात यावा. विकासकामांमध्ये विलंब होऊ नये आणि निधीचा अपुरा वापर थांबवण्यात यावा. नागरिकांना घरे त्वरित ताब्यात देण्यात यावीत आदी मागण्या शिवसेनेच्या शिष्टमंडळाने केल्या असून जर या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले तर मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल. यासोबतच अधिकाऱ्यांनी व बिल्डरांनी त्वरित योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# निरीक्षक वैधमापनशास्त्र कार्यालये स्थलांतरीत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, ठाणे जिल्हा क्र.1, ठाणे या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असलेले निरीक्षक वैध मापनशास्त्र, ठाणे-1, ठाणे-2, ठाणे-3 व भाईंदर विभाग ही कार्यालये खाजगी जागेत भाडेतत्वावर तृणपुष्प सोसायटी, पाईप लाईन रोड, लुईसवाडी, ठाणे (प) 400604 या जागेत कार्यरत होते.

हे कार्यालय दि.18 फेब्रुवारी 2025 पासून नवीन जागेत स्थालांतरित करण्यात आले असून या कार्यालयांचा नवीन पत्ता निरीक्षक वैध मापनशास्त्र ठाणे-1, ठाणे-2, ठाणे-3 व भाईंदर विभाग ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवा, येथील प्रशासकीय भवन पहिला मजला, रोड नं. 27 आणि 34, वागळे आगार, वागळे इस्टेट, ठाणे (प) -400604 असा असल्याचे ठाणे जिल्हा क्र.1, ठाणे वैधमापन शास्त्र उपनियंत्रक रा.फ.राठोड यांनी कळविले आहे.

# दिल्लीतील साहित्य संमेलनात महाराष्ट्र सरकारचा चित्ररथ ठरला आकर्षक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, गड-किल्ले, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिकांच्या रचना अशी आकर्षक सजावट चित्ररथावर करण्यात आली होती. दिल्लीकरांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. 98 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे विशेष चित्ररथ तयार करण्यात आला. या चित्ररथाच्या माध्यमातून देशाच्या राजधानीत महाराष्ट्राच्या अभिजात भाषा-संस्कृतीचे दर्शन घडले.

# जिल्हा परिषद केंद्र शाळा पिवळी येथे शिवजयंती साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, महिला बचत गट, शिक्षक पालक संघ, ग्रामस्थ व तरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद केंद्र शाळा पिवळी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

यामध्ये सर्वप्रथम शाळेमध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मूर्ती पूजन करून संपूर्ण गावातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती असलेल्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर महिलांचा हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बहुसंख्य महिला, पुरुष,



आजी-माजी विद्यार्थी, युवक, युवती हे या रॅलीसह शिवजयंती उत्सवात सहभागी झाले होते.

सदर, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक-शिक्षिकेतर, शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, महिला बचत गट, शिक्षक पालक संघ, ग्रामस्थ व तरुण मित्र मंडळ पदाधिकारी यांनी परिश्रम हाती घेतले होते.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024